राज्य आयोग, महाराष्ट्र, मुंबई
आवक क्र. 6479
दिनांक 20/08/2014
आवक लिपिक स्वाक्षरी
प्रबंधक स्वाक्षरी

**राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच या कार्यालयातील लघुलेखक (उच्चश्रेणी व निम्नश्रेणी), वाहनचालक व गट-ड (शिपाई व सफाई कामगार) पदांचे सेवाप्रवेश नियम सामान्य प्रशासन विभागाने अधिसुचित केल्याप्रमाणे <u>अंमलबजावणी करणेबाबत ...</u>**

**महाराष्ट्र शासन**
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
**शासन निर्णय क्रमांक : ग्रासंनि-२०१४/प्र.क्र.९६/ग्रा.सं.४,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १६ ऑगस्ट , २०१४.

<u>वाचा</u> :- (१) शासन अधिसूचना क्र. साप्रवि आरटीआर/प्र.क्र.१०७६/३१०७/१२, दि. १४.११.१९८०,

(२) शासन अधिसूचना क्र. साप्रवि आरटीआर १०९४/प्र.क्र.९/९४/१२, दि. ३०.१०.१९९५,

(३) शासन अधिसूचना क्र. साप्रवि आरटीआर १०९४/प्र.क्र.८/९४/१२, दि. २४ जून, १९९७,

(४) शासन अधिसूचना क्र. साप्रवि आरटीआर १०९४/प्र.क्र.८/९४/१२, दि. १३.११.२००३,

(५) विभागाचा शासन निर्णय क्र. ग्रासंक २२१०/प्र.क्र.२६६/ग्रासं-३, दि. १६.११.२०१३

**<u>शासन निर्णय :</u>**

ग्राहक संरक्षण यंत्रणेसाठी लागणारा कर्मचारी वृंद वैध मापन शास्त्र विभागामधून उपलब्ध करुन देण्यात येत होता. शासनाने वरील संदर्भीय दिनांक १६.११.२०१३ च्या शासन निर्णयान्वये ग्राहक संरक्षण यंत्रणा व वैध मापन शास्त्र विभागातील अधिकारी/कर्मचारी स्वतंत्र करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार संबंधित कर्मचाऱ्यांचे विकल्प घेऊन विकल्पानुसार समायोजन करण्यात आले आहे.

२. ग्राहक संरक्षण यंत्रणेसाठी कर्मचारी वृंद हा वैध मापन शास्त्र विभागामधून उपलब्ध करुन दिला जात असल्याने या यंत्रणेतील कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र सेवा प्रवेश नियम अस्तित्वात नव्हते. वरील संदर्भिय दिनांक १६.१.२०१३ च्या शासन निर्णयान्वये दोन्ही यंत्रणेतील संवर्ग स्वतंत्र करण्याचा निर्णय घेण्यात आल्यामुळे ग्राहक संरक्षण यंत्रणेतील संवर्गातील पदांसाठी स्वतंत्र सेवा प्रवेश नियम करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

३. ग्राहक संरक्षण यंत्रणेतील खाली नमूद केलेल्या संवर्गातील पदांना त्यांच्यासमोर नमूद केलेल्या सामान्य प्रशासन विभागाच्या सेवा प्रवेश नियमानुसार नियुक्त्या करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | पद | सामान्य प्रशासन विभागाने अधिसूचित केलेल्या अधिसूचना |
|---|---|---|
| १ | लघुलेखक (उच्च श्रेणी) गट-ब | शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. आरटीआर १०९४/ प्र.क्र.८/९४/१२, दि. २४ जून, १९९७ शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. आरटीआर १०९४/ प्र.क्र.८/९४/१२, दि. १३.११.२००३. |
| २ | लघुलेखक (निम्नश्रेणी) गट-ब | |
| ३ | वाहनचालक गट-क | शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. आरटीआर १०७६/ प्र.क्र.३१०७/१२, दि. १४ नोव्हेंबर, १९८० |
| ४ | शिपाई व सफाई कामगार गट-ड | शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. आरटीआर १०९४/ प्र.क्र.९/९४/१२, दि. ३० ऑक्टोबर, १९९५ |

४. हे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक क्र. २०१४०८१६१२५७५९४६०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Uddhav Dattatraya Walunj

Digitally signed by Uddhav Dattatraya Walunj
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=FCSCP, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Uddhav Dattatraya Walunj
Date: 2014.08.16 16:32:19 +05'30'

(उ. द. वाळुंज)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१) मा. राज्यपालांचे सचिव

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
५) सर्व मंत्री/राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव.
६) विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
७) विधानसभा/विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
८) मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक
९) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
१०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
११) महालेखापाल (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१३) मा. नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४) प्रबंधक, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई.
१५) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१६) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१७) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१८) सरकारी वकील, उच्च न्यायालय, मूळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१९) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
२०) सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई.
२१) प्रबंधक, सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच.
२२) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
२३) अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई.
२४) सर्व उप सचिव/अवर सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५) सर्व कार्यासने, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२६) निवडनस्ती/ग्रासं-४.

## सामान्य प्रशासन विभाग

### मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० ऑक्टोबर, १९९५.

**भारताचे संविधान.**

क्रमांक : आरटीआर १०९४/प्र.क्र.९/९४/१२- भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन आणि अस्तित्वात असलेले संबंधित सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश अधिक्रमिक करुन, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या विभागातील, सोबत जोडलेल्या अनुसूचितील गट "ड" पदाच्या सेवाभरतीचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत, जसे :-

१. या नियमांना महाराष्ट्र शासनाच्या विभागातील गट "ड" पदांचे (सेवाप्रवेश) नियम, १९९५ असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर, --

(अ) अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या पदांवर सेवाभरती करण्याबाबत "नियुक्ती प्राधिकारी" म्हणजे त्या पदावर नेमणुका करण्यात जो सक्षम आहे असा प्राधिकारी ;

(ब) विभाग म्हणजे संविधानाच्या अनुच्छेद-१६६ अन्वये बनविलेल्या महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या पहिल्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेले विभाग, यामध्ये अशा नियमांच्या अधिपत्याखालील इतर कार्यालये देखील अंतर्भूत आहेत ;

(क) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन ;

(ड) "अनुसूची" म्हणजे या नियमांना जोडलेली अनुसूची.

३. अनुसूचीमधील भाग "अ" मध्ये उल्लेख केलेल्या पदांवरील नेमणुका अनुसूचीमधील भाग "ब" मध्ये नमूद केलेल्या पदांवर काम करीत आहेत अशा व्यक्तींमधून आणि अनुसूची भाग "क" मधील पदांवर काम करीत आहेत , आणि ज्यांची किमान ३ वर्षांची नियमित सेवा त्या पदांवर झालेली आहे आणि नियम-६ च्या खंड "क" च्या उपखंड (२) मधील नामनिर्देशनाने भरतीसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करीत आहेत अशा व्यक्तींमधून "ज्येष्ठता अधीन पात्रता" या आधारावर पात्र ठरविलेल्या योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीने करता येतील.

४. अनुसूचीमधील भाग "अ" मध्ये उल्लेख केलेल्या पदांवरील नेमणुका पुढीलपैकी कोणत्याही मार्गाने करता येतील :-

(अ) अनुसूची मधील भाग "ड" मध्ये उल्लेख केलेल्या पदावर काम करीत असलेल्या आणि ज्यांची त्या पदांवर किमान ३ वर्षांची नियमित सेवा झाली आहे त्या व्यक्तींमधून ज्येष्ठता अधीन पात्रता या आधारावर पात्र ठरलेल्या योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीने किंवा,

(ब) अनुसूचीमधील भाग "क" मधील पदांवर काम करीत असलेल्या आणि नियम "६" च्या खंड "क" च्या उपखंड (२) मधील शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेल्या योग्य व्यक्तींच्या बदलीने.

५. अनुसूचीमधील भाग "क" मध्ये उल्लेख केलेल्या पदांवरील नेमणुका अनुसूचीमधील भाग "ई" मध्ये नमूद केलेल्या पदांवर काम करीत असलेल्या व्यक्तींकडून, ज्यांची किमान ३ वर्षांची नियमित सेवा त्या पदांवर झालेली आहे, अशा व्यक्तींमधून ज्येष्ठता अधीन पात्रता या आधारावर पात्र ठरविलेल्या योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीने करता येतील.

६. अनुसूचीमधील भाग "ड" मध्ये उल्लेख केलेल्या पदांवरील नेमणुका पुढीलपैकी कोणत्याही पध्दतीने करता येतील :-

(अ) अनुसूची भाग "फ" मध्ये उल्लेख केलेल्या पदांवर काम करीत असलेल्या व्यक्तींमधून ज्यांची त्या पदांवर किमान ३ वर्षांची नियमित सेवा झालेली आहे, अशा व्यक्तींमधून ज्येष्ठता अधीन पात्रता या आधारावर पात्र ठरविलेल्या योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीने किंवा,

(ब) अनुसूचीमधील भाग "ई" मधील काम करीत असलेल्या आणि नियम-६ च्या खंड (क) च्या उपखंड (२) मधील शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेल्या योग्य व्यक्तींच्या बदलीने किंवा,

(क) पुढील अटी पूर्ण करणा-या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने :-

(१) ज्यांचे वय १८ वर्षांपेक्षा कमी आणि ३० वर्षांपेक्षा जास्त नाही आणि

(२) जो शासनाने मान्यता दिलेल्या शाळेमधून प्राथमिक शाळेची ४ थी इयत्ता उत्तीर्ण आहे.

परंतु, नियुक्ती प्राधिका-यांस जे माजी सैनिक किंवा लष्करी सेवेचे निवृत्ती वेतनधारक असतील अशा उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ४५ वर्षांपर्यंत शिथिल करता येईल.

७. अनुसूची "ई" मध्ये उल्लेख केलेल्या पदांवरील नेमणुका ज्यांचे वय १८ वर्षांपेक्षा कमी आणि ३० वर्षांपेक्षा जास्त नाही, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करता येतील. परंतु, नियुक्ती प्राधिका-यास जे माजी सैनिक किंवा लष्करी सेवेचे निवृत्ती वेतनधारक आहेत अशा उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ४५ वर्षांपर्यंत शिथिल करता येईल.

८. अनुसूचीमधील भाग "फ" मध्ये उल्लेख केलेल्या पदांवरील नेमणुका :-

(१) ज्यांचे वय १५ वर्षांपेक्षा कमी नाही आणि १८ वर्षांपेक्षा जास्त नाही आणि

(२) जो शासनाने मान्यता दिलेल्या शाळेमधून प्राथमिक शाळेची ४ थी इयत्ता उत्तीर्ण आहे अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करता येतील.

९. वरील नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी अनुसूचिमध्ये उल्लेख केलेल्या पदांपैकी कोणत्याही पदांवर आवश्यकतेनुसार शासनास योग्य वाटतील असे विशेष अथवा सर्वसाधारण आदेश निर्गमित करुन त्यामध्ये निर्देशित केलेल्या पध्दतीनुसार विशेष परिस्थितीत सेवा भरती करता येईल.

## अनुसूची

| अनुक्रमांक | पदनाम |
|---|---|
| | भाग-अ |
| १ | जमादार |
| २ | चोपदार |
| | भाग-ब |
| ३ | हवालदार |
| ४ | नाईक |
| ५ | उद्वाहन चालक |
| ६ | आवेष्टक |
| ७ | फाईल करी |
| ८ | दफ्तरी |
| ९ | दप्तरबंद |
| १० | रोनिओ शिपाई/रोनिओ चालक |
| ११ | मुकादम |
| १२ | दारवान |
| | भाग-क |
| १३ | स्वच्छक मुकादम |
| १४ | सफाईगार मुकादम |
| | भाग-ड |
| १५ | शिपाई |
| १६ | सहायक दारवान |
| १७ | संदेश वाहक |
| | भाग-इ |
| १८ | स्वच्छक |
| १९ | सफाईगार |
| | भाग-फ |
| २० | बाल शिपाई |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

य.मा.जोशी
शासनाचे उप सचिव.